PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Topi Var Topi
Year: 1995

Song: Kuth Kuth Shodhu
Lyricist:

कुठं कुठं शोधू तुला साजणा
टाकली मी तुझ्यासाठी लाज ना
कुठं कुठं शोधू तुला साजणा
टाकली मी तुझ्यासाठी लाज ना
आई बाप तोडलं
घरदार सोडलं
ठरलेलं लगीन राया
तुझ्यापायी मोडलं
दिल्या वचनाला सख्या जाग ना
कुठं कुठं शोधू तुला साजणा

घडी घडी याद तुझी येते रे
धडधड काळजात होते रे
घडी घडी याद तुझी येते रे
धडधड काळजात होते रे
एकली मी राहू किती
वाट तुझी पाहू किती
केला मी काय गुन्हा
एकली मी राहू किती
वाट तुझी पाहू किती
केला मी काय गुन्हा
कुठं कुठं शोधू तुला साजणा
टाकली मी तुझ्यासाठी लाज ना

किती झेलू पापी नजरा सांग रे
दे तू कुंकवाचा मला मान रे
किती झेलू पापी नजरा सांग रे
दे तू कुंकवाचा मला मान रे
गळयामधे डोरलं पायात जोडवी
नाकात नथं हया घाला
गळयामधे डोरलं पायात जोडवी
नाकात नथं हया घाला
कुठं कुठं शोधू तुला साजणा
टाकली मी तुझ्यासाठी लाज ना
आई बाप तोडलं
घरदार सोडलं
ठरलेलं लगीन राया
तुझ्यापायी मोडलं
दिल्या वचनाला सख्या जाग ना
कुठं कुठं शोधू तुला साजणा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*